# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार

वर्ष २, अंक २०] शुक्रवार, जुलै ३०, २०१०/श्रावण ८, शके १९३२ [ पृष्ठे २, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ३१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**


**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.**—महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. | **पृष्ठे** १-२ |


दिनांक २९ जुलै २०१० रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.


**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.


---

## सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ३० जुलै २०१० रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९६४ चा महा. २०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०१० असे म्हणावे.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मधील, खंड (छ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १९६४ चा महा. २०.

" (छ-क) " व्यवस्थापन संचालक " म्हणजे, राज्य पणन मंडळाचा व्यवस्थापन संचालक म्हणून कलम ३९ख-१ अन्वये राज्य शासनाने नेमलेली व्यक्ती ; ".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ३९ख ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ख मध्ये,—

(क) खंड (नऊ) मध्ये, " व व्यवस्थापन संचालक " हा मजकूर वगळण्यात येईल

(ख) खंड (नऊ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (दहा) व्यवस्थापन संचालक — सदस्य-सचिव."

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० यामध्ये कलम ३९ख-१ समाविष्ट करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ३९ख नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

राज्य पणन मंडळाचा व्यवस्थापन संचालक.

" **३९ख-१**. (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, राज्य पणन मंडळाचा व्यवस्थापन संचालक म्हणून एखाद्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने, नेमणूक करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये नेमणूक केलेला व्यवस्थापन संचालक या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमान्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या अशा अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये पार पाडील.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक २९] शुक्रवार, जुलै ३०, २०१०/श्रावण ८, शके १९३२ [ पृष्ठे २, किंमत : रुपये १९.००

असाधारण क्रमांक ५९


## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) (Amendment) Act, 2010 (Mah. Act No. XXI of 2010), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XXI OF 2010.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 30th July 2010.)*

An Act further to amend the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963.

Mah. XX of 1964. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Sixty-first Year of the Republic of India as follows :—

Short title. **1.** This Act may be called the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) (Amendment) Act, 2010.

Amendment of section 2 of Mah. XX of 1964.

**2.** In section 2 of the Maharashtra Agricultural Produce Marketing (Development and Regulation) Act, 1963 (hereinafter referred to as "the principal Act"), after clause (*g*), the following clause shall be inserted, namely:— Mah. XX of 1964.

"(*g-a*) "Managing Director" means a person appointed by the State Government, as the Managing Director of the State Marketing Board under section 39B-1;".

Amendment of section 39B of Mah. XX of 1964.

**3.** In section 39B of the principal Act, —

(*a*) in clause (*ix*), the words "and the Managing Director" shall be deleted ;

(*b*) after clause (*ix*), the following clause shall be added, namely :—

"(*x*) the Managing Director - Member Secretary.".

Insertion of section 39B-1 in Mah. XX of 1964.

**4.** After section 39B of the principal Act, the following section shall be inserted, namely :—

Managing Director of State Marketing Board.

"**39B-1.** (*1*) The State Government may, by notification in the *Official Gazette*, appoint, on deputation, an officer to be the Managing Director of the State Marketing Board.

(*2*) The Managing Director appointed under sub-section (*1*) shall exercise such powers and perform such functions as may be specified under this Act or rules made thereunder.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.